नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ३५ Issue - 35 | वार - सोमवार दि. २९ जून २०२६ Blow- Monday Date 29 JUNE 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर आराखड्यासाठी ३९९३.९० कोटीचा निधी मंजूर

## श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर आराखडा तयार करण्यासाठी वास्तुविशारद नियुक्त करावा : पालकमंत्री जयकुमार गोरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) : राज्यशासनाने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर आणि वाणिज्य आराखड्यासाठी ३ हजार ९९३ कोटी ९० लाखाचा निधी मंजूर केलेला आहे. यासाठी शासन निर्देशाप्रमाणे आराखडा तयार करण्यासाठी वास्तूविशारद नियुक्त करणे आवश्यक आहे. तरी सार्वजनिक बांधकाम विभाग पंढरपूरने पुढील चार दिवसात यासाठीची स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया राबवावी, असे निर्देश राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

नियोजन भवन येथील सभागृहात आयोजित श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर व वाणिज्य संकुल आराखडा पंढरपूर जिल्हास्तरीय समिती बैठकीत पालकमंत्री जयकुमार गोरे मार्गदर्शन करत होते. यावेळी आमदार देवेंद्र कोठे, जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक विजय कबाडे, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सह आयुक्त नगरपालिका आशिष लोकरे, वीज वितरण चे अधीक्षक अभियंता सुनील माने, प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता श्याम कुंभार, पंढरपूर कार्यकारी अभियंता अमित निमकर, उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, पंढरपूर उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, पंढरपूर नगरपरिषद मुख्याधिकारी महेश रोकडे, यांच्या सह सर्व संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. गोरे पुढे म्हणाले की, पंढरपूर सार्वजनिक बांधकाम विभागाने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर व वाणिज्य आराखड्यासाठी वास्तूविशारद नियुक्तीची प्रक्रिया तात्काळ सुरू करावी. स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया करून या आराखड्याच्या अनुषंगाने संबंधित वास्तुविशारद यांनी जिल्हास्तरीय समिती समोर सादरीकरण करावे. हे सादरीकरण जिल्हास्तरीय समितीने मान्य झाल्यानंतर त्याविषयीचे




सादरीकरण मुख्यमंत्री महोदय यांच्यासमोर केले जाऊन त्यास मंजुरी प्रदान होईल, असे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्तिकेयन म्हणाले की, या आराखड्यासाठी नियंत्रण अधिकारी म्हणून शासनाने जिल्हाधिकारी यांची नियुक्ती केलेली आहे. तसेच वास्तुविशारद नियुक्तीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत वेळेत करून घेऊ असे त्यांनी सांगितले. कार्यकारी अभियंता अमित निमकर यांनी सर्वप्रथम आराखड्यातील कामाचे नियोजन करण्यासाठी वास्तुविशारद नियुक्त करावा लागेल असे सांगून त्याला शासकीय नियमाप्रमाणे शुल्कही द्यावे लागेल, अशी माहिती दिली.

प्रारंभी जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांनी आराखड्यातील सर्व घटकांसाठी एकूण ३,९९३.९० कोटी निधी मंजूर करण्यात आल्याची माहिती दिली असून या निधीचे घटकनिहाय वाटप पुढीलप्रमाणे आहे: वाकऱ्यांसाठी समग्र सोयीसुविधांचा विकास २८८.६६ कोटी, भाविकांना व्यावसायिक संधी ३६.०० कोटी, पुरातन मंदिर व मठांचे जतन व संवर्धन २५४.५१ कोटी, मंदिर परिसर कॉरिडॉर ५१०.२७ कोटी व एकूण पंढरपूर कॉरिडॉर १,०८९.४४ कोटी, नगर प्रदक्षिणा मार्ग विकास १६२.८४ कोटी, नदी घाटांचा विकास व सुशोभीकरण ₹८८८.३८ कोटी, वाहतूक व व्यापारी संकुल ४६०.४० कोटी, शहर सुशोभीकरण १२१.६० कोटी, शहरास जोडणारे पूल व हेलिपॅड ९००.०० कोटी, पालखी तळांचा विकास ₹१३५.११ कोटी, पुनर्वसन खर्च १,०९२.१२ कोटी, भूमिसंपादन व बाह्य इमारत मोबदला २३४.४० कोटी, ज्यामुळे एकूण पुनर्वसन व मोबदला २,०२६.५२ कोटी इतका आहे. यावेळी या कामासाठी नियुक्त करण्यात आलेले वास्तूविशारद योगेश राठी यांनी श्री संत नामदेव महाराज समारक अंतर्गत अंतर्भूत केलेल्या कामांची माहिती पीपीटी द्वारा बैठकीत सांगितली.

# कृषी दिनानिमित्त १ जुलै रोजी राज्यस्तरीय कृषी पुरस्कार प्रदान सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : हरित क्रांतीचे प्रणेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या कृषी दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत दिनांक १ जुलै २०२६ रोजी डोम, सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम, वरळी, मुंबई-१८ येथे राज्यस्तरीय कृषी पुरस्कार प्रदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात सन २०२३ व २०२४ या वर्षांतील राज्यस्तरीय कृषी पुरस्कारांचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार असून कृषी, कृषि संलग्न क्षेत्र, फलोत्पादन, सेंद्रिय शेती, कृषी विस्तार व कृषी विकास क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या एकूण १८९ शेतकरी, संस्था व कृषी अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात येणार असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे. या पुरस्कार सोहळ्यास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री भरतशेठ गोगावले, कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, राज्यमंत्री (मृद व जलसंधारण ) इंद्रनील नाईक व इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. राज्यातील कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार, उत्पादनवाढ, शाश्वत शेती, सेंद्रिय शेती, फलोत्पादन आणि कृषी विस्तार क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा गौरव करण्यासाठी हे पुरस्कार प्रदान करण्यात येतात. कृषी क्षेत्रातील उत्कृष्टतेचा सन्मान करून इतर शेतकऱ्यांना प्रेरणा देणे हा या पुरस्कारांचा मुख्य उद्देश आहे. यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार, वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार, जिजामाता कृषिभूषण पुरस्कार, कृषिभूषण (सेंद्रिय शेती) पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार, युवा शेतकरी पुरस्कार, उद्यानपंडित पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार(सर्वसाधारण गट/आदिवासी गट ) तसेच पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार (आयुक्तालय/मंत्रालय स्तर) या विविध पुरस्कारांचा समावेश आहे. राज्यभरातील पुरस्कारार्थी, त्यांचे कुटुंबीय, कृषी अधिकारी, कृषी तज्ज्ञ आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न होणार असून महाराष्ट्राच्या कृषी विकासात मोलाचे योगदान देणाऱ्या कृषी क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींचा हा सन्मान सोहळा ठरणार आहे.

# भरधाव ट्रकवर वॅगनआर कार आदळली, ५ जणांचा जागीच मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अमरावती : समृद्धी महामार्गावर पुन्हा एकदा भीषण अपघाताने पाच जणांचा बळी घेतला आहे. अमरावती जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे तालुक्यात रविवारी सकाळी झालेल्या या अपघातात एकाच कुटुंबातील पाच जणांचा जागीच मृत्यू झाला. चंद्रपूरहून मुंबईकडे निघालेली वॅगनआर कार भरधाव ट्रकच्या मागे आदळल्याने हा भीषण अपघात झाला. धडकेची तीव्रता इतकी प्रचंड होती की कारचा अक्षरशः चुराडा झाला. अपघाताची माहिती मिळताच पोलीस आणि समृद्धी महामार्गावरील आपत्कालीन बचाव पथकाने घटनास्थळी धाव घेतली. अपघात धामणगाव रेल्वे तालुक्यातील समृद्धी महामार्गावरील चैनल क्रमांक १०५ जवळ घडल्याचे सांगण्यात आले.

### आषाढी वारीच्या अनुषंगाने पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केली विविध ठिकाणांची पाहणी

# आषाढी यात्रा कालावधीत स्वच्छतेला प्राधान्य द्यावे : पालकमंत्री जयकुमार गोरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आषाढी शुद्ध एकादशी सोहळा २५ जुलै २०२६ रोजी असून, या यात्रा सोहळ्यानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपुरात पालखी सोहळ्यासोबत मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक येत असतात. या यात्रा कालावधीत प्रशासनाने वारकरी भाविकांना पायाभूत सुविधा देण्याबरोबरच स्वच्छतेला प्राधान्य द्यावे अशा सूचना ग्रामविकास मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिल्या.



आषाढी वारी २०२६ अनुषंगाने पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी वाखरी पालखीतळ, ६५ एकर व वाळवंट येथे पाहणी केली, त्या प्रसंगी ते मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, पोलिस उप विभागीय अधिकारी प्रशांत डगळे, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सह आयुक्त नगरपालिका आशिष लोकरे, अन्न धान्य पुरवठा अधिकारी ओंकार पाडोळे, वीज वितरण चे अधीक्षक अभियंता सुनील माने, प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार, उप मुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत सूर्यकांत भुजबळ, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता श्याम कुंभार, पंढरपूर उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, कार्यकारी अभियंता अमित निमकर, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, गटविकास अधिकारी अमोल जाधव यांच्यासह सर्व संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, गतवर्षी आषाढी यात्रा कालावधीत प्रशासनाने वारकरी भाविकांसाठी यात्री पालखीतळ, भक्ती सागर (६५ एकर), येथे चांगल्या सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या त्याचप्रमाणे आताही चांगल्या व अधिकच्या सुविधा उपलब्ध कराव्यात. वाखरी पालखी तळावर कायम असणाऱ्या शौचालय परिसरात कॉंक्रिटीकरण करून घ्यावे. पालखी तळावरील खड्डे बुजवावेत तसेच मुरमीकरण करून सपाटीकरण करावे. प्रकाश व्यवस्था करावी. पालखी तळावर पाणी साठू नये यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात.

कॉलेज चौकातील पुलाचे काम अपूर्ण असून ते तात्काळ पूर्ण करावेत सदरच्या कामाच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात राडारोडा पडल्याने अपघात होण्याची शक्यता असून, संबंधित ठेकेदाराने ते काम तात्काळ व वेळेत पूर्ण करावे. अन्यथा संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी. तसेच ते काम करण्यासाठी कार्यक्षम ठेकेदार नेमून तात्काळ पूर्ण करावे. शहरातील रस्ते व डिव्हायडर स्वच्छ करावे. आवश्यक ठिकाणी डिव्हाइडरला रंगकाम करावे. आषाढी यात्रेत भाविकांच्या मोठ्या प्रमाणात निधीची उपलब्धता केली असून, जिल्ह्यात पालखी सोहळे दाखल होण्यापूर्वी सर्व सुविधा उपलब्ध ठेवाव्यात. सरगम चौकातील पुलाखालून वाळवंटापर्यंत रस्ता नगरपालिकेने करावा. ६५ एकर येथे स्वच्छता, पिण्याचे पाणी, विद्युत पुरवठा, वैद्यकीय सुविधा उपलब्धता बरोबर स्वच्छता ठेवावी. चंद्रभागा पत्राच्या काठावरील काटेरी झाडे झुडपे काढावीत तसेच मातीचे ढिगारे काढून सपाटीकरण करावे अशा सूचनाही पालकमंत्री गोरे यांनी दिल्या.

यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी वाखरी पालखीतळ, भक्ती सागर (६५ एकर), चंद्रभागा नदीपात्र येथील पाहणी केली.



## संपादकीय....

### जय्यत तयारी

आषाढी शुद्ध एकादशी सोहळा २५ जुलै २०२६ रोजी असून, या यात्रा सोहळ्यानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपुरात पालखी सोहळ्यासोबत मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक येत असतात. या यात्रा कालावधीत प्रशासनाने वारकरी भाविकांना पायाभूत सुविधा देण्याबरोबरच स्वच्छतेला प्राधान्य दिले जात आहे. आषाढी वारी २०२६ अनुषंगाने पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी वाखरी पालखीतळ, ६५ एकर व वाळवंट येथे पाहणी केली. गतवर्षी आषाढी यात्रा कालावधीत प्रशासनाने वारकरी भाविकांसाठी यात्री पालखीतळ, भक्ती सागर (६५ एकर), येथे चांगल्या सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या त्याचप्रमाणे आताही चांगल्या व अधिकच्या सुविधा उपलब्ध कराव्यात. वाखरी पालखी तळावर कायम असणाऱ्या शौचालय परिसरात काँक्रिटीकरण करून घ्यावे. पालखी तळावरील खड्डे बुजवावेत तसेच मुरमीकरण करून सपाटीकरण करावे. प्रकाश व्यवस्था करावी. पालखी तळावर पाणी साठू नये यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात. दरम्यान राज्य शासनाने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर आणि वाणिज्य आराखड्यासाठी ३ हजार ९९३ कोटी ९० लाखाचा निधी मंजूर केलेला आहे. यासाठी शासन निर्देशाप्रमाणे आराखडा तयार करण्यासाठी वास्तूविशारद नियुक्त करणे आवश्यक आहे. तरी सार्वजनिक बांधकाम विभाग पंढरपूरने पुढील चार दिवसात यासाठीची स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया राबवावी अशा सूचना केल्या आहेत. पंढरपूर सार्वजनिक बांधकाम विभागाने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर व वाणिज्य आराखड्यासाठी वास्तूविशारद नियुक्तीची प्रक्रिया तात्काळ सुरू करावी. स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया करून या आराखड्याच्या अनुषंगाने संबंधित वास्तुविशारद यांनी जिल्हास्तरीय समिती समोर सादरीकरण करावे. हे सादरीकरण जिल्हास्तरीय समितीने मान्य झाल्यानंतर त्याविषयीचे सादरीकरण मुख्यमंत्री महोदय यांच्यासमोर केले जाऊन त्यास मंजुरी प्रदान होणार आहे.

# चला तर मग, मस्तपैकी चिखल खेळुया....

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
**(२९ जून: आंतरराष्ट्रीय चिखल दिवस.)**

चिखल म्हणजे चिकणमाती, गाळ किंवा पाण्यात मिसळलेली चिकणमाती होय. हे सहसा पावसानंतर किंवा पाण्याच्या स्त्रोतांजवळ तयार होते. प्राचीन मातीचे साठे भूगर्भीय कालांतराने घट्ट होऊन शेल किंवा मडस्टोन-ल्युटाइट्स सारखे गाळाचे खडक तयार करतात. जेव्हा भूगर्भीय चिखलाचे साठे मुहानांमध्ये तयार होतात, तेव्हा परिणामी थरांना बे मड्स म्हणतात. मातीचा वापर बहुतेक घरांसाठी बांधकाम संसाधन म्हणून, जसे कवेलू, विटा, गारा आदी शतकानुशतके केला जातो आणि बाईंडर म्हणून देखील वापरला जातो.

छी, छी, छीऽऽऽ..! चिखल हे एक उपद्रव वाटत आहे, नाही का? पाऊस पडताच सर्वत्र चिखल होतो आणि अक्षरशः सर्वत्र चिखल होतो. या निसरड्या, चिकट घाणेरड्या पदार्थाचे कोणतेही फायदे नक्कीच नाहीत, बरोबर? चुकीचे. आणि आंतरराष्ट्रीय चिखल दिनाचे निर्माते ते सिद्ध करण्यासाठी बाहेर आहेत! शेवटी, चिखल हा घराबाहेरील भागांसाठी अतिशय महत्त्वाचा आहे आणि घराबाहेर म्हणजे ताजी हवा आणि व्यायाम, लोकांसाठी दोन सर्वोत्तम गोष्टी. आणि म्हणून जर आपण थोडे घाण झालो तर? बऱ्याच संशोधनातून असे दिसून आले आहे की विशिष्ट प्रमाणात जीवाणूंच्या संपर्कात येणे आपल्यासाठी चांगले आहे, कारण ते रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास मदत करते, अक्षरशः निर्जंतुक वातावरणात राहण्याऐवजी, ज्यामुळे आपले शरीर खूप असुरक्षित होते. किती खनिजे चिखल करू शकतात हे सांगायला नको - लोक मड मास्क आणि स्पामध्ये आंघोळीसाठी शेकडो डॉलर्स देण्याचे एक कारण आहे. मग आपण कशाची वाट पाहत आहात? चला घाण करूया! कारण, आजीवन आपली चिखलाशी नाळ घट्ट जोडली आहे. संत तर सांगतात, की

मातीची रे काया तुझी;
अंती मातीमंदी जायाची।।

अमेरिकन वनस्पतिशास्त्रज्ञ ल्यूथर बरबँक यांनी म्हटले आहे, प्रत्येक मुलाकडे मातीचे पाईप, तृणधान्य, पाण्यातील बग, टॅडपोल, बेडूक, मातीची कासवे, जंगली स्ट्रॉबेरी, एकोर्न, चेस्टनट, झाडे चढण्यासाठी असावीत. वेडसाठी ब्रूक्समधमाश्या, फुलपाखरे, पाळीव प्राण्यांसाठी विविध प्राणी, गवताचे मैदान, पाइन-शंकू, खडक ते टोल, वाळू, साप आणि हॉर्नेट; यापासून वंचित राहिलेले कोणतेही मूल... शिक्षणाच्या सर्वोत्तम भागापासून वंचित राहिले आहे.



आंतरराष्ट्रीय चिखल दिनाचा इतिहास असा, की आंतरराष्ट्रीय चिखल दिवसाच्या निर्मात्यांना पृथ्वीवरील सर्व मुलांना एकमेकांच्या जवळ जाण्यास मदत करण्यासाठी एक मार्ग शोधायचा होताआणि पृथ्वीद्वारेच ते करण्याचा यापेक्षा चांगला मार्ग कोणता? आंतरराष्ट्रीय चिखल दिन सन २००९मध्ये एका जागतिक मंचाच्या कार्यक्रमात सुरू झाला, जेव्हा ऑस्ट्रेलियातील गिलियन मॅकऑलिफ आणि नेपाळमधील बिष्णू भट्टा समुदायाच्या भावनांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि आपल्या सभोवतालच्या जगाबद्दल कौतुक करण्याच्या मार्गांबद्दल बोलण्यासाठी एकत्र आले. त्यानंतरच्या सहकार्याने हॉलंड ते नेपाळ ते युनायटेड स्टेट्स पर्यंत जगभरातील शिक्षक, मुले आणि कुटुंबांना दरवर्षी २९ जून रोजी एकत्रितपणे आंतरराष्ट्रीय चिखल दिन साजरा करण्यासाठी प्रेरित केले. वय, वंश आणि धर्म याची पर्वा न करता, चिखलात झाकलेले, आम्ही सर्व एकसारखे दिसतो!

आंतरराष्ट्रीय चिखल दिवस कसा साजरा करायचा? तर आंतरराष्ट्रीय चिखल दिन साजरा करण्याचे असंख्य मार्ग आहेत, परंतु त्या सर्वांमध्ये एक गोष्ट समान आहे, तुम्हाला घाण करावी लागेल. जर तुमची मुले असतील तर हा दिवस विशेषतः मजेदार असू शकतो, कारण मुलांइतके गलिच्छ होणे कोणाला आवडते? आंतरराष्ट्रीय चिखल दिनानिमित्त सर्वात सर्जनशील आणि मजेदार क्रियाकलापांपैकी एक म्हणजे मातीची शिल्पे किंवा मड केक बनवणे. थोडे अधिक माती किंवा पाणी घालून तुम्ही वापरत असलेल्या चिखलाची सुसंगतता समायोजित करणे सोपे आहे, त्यामुळे प्रक्रियेत भरपूर निश्चित हास्य आणि दर्जेदार कौटुंबिक वेळेचा आनंद घेताना तुम्हाला जे बनवायचे आहे ते बनवणे सोपे असावे. या दिवसाचा पूर्ण आनंद लुटण्याचा आणखी एक सोपा मार्ग म्हणजे ब्लो-अप पूल वापरून घरगुती मातीचा खड्डा बनवणे. हे केवळ स्वस्तच नाही तर खरोखरच एक अनोखा अनुभव देखील देते. एकदा तुम्ही एक छोटासा ब्लो-अप पूल विकत घेतल्यावर तुम्हाला फक्त ते मातीने भरावे लागेल जे माती आणि पाण्याचे मिश्रण वापरून सहज भरता येईल जे तुमची मुले नंतर पसरू शकतात. फक्त तुम्ही तयार आहात याची खात्री करा. तुमचे कपडे सोलून काढल्यावर फेकून द्या, कारण ते कपडे पुन्हा स्वच्छ होतील असा कोणताही मार्ग नाही.

चिखल म्हणजे चिकणमाती, गाळ किंवा पाण्यात मिसळलेली चिकणमाती होय. हे सहसा पावसानंतर किंवा पाण्याच्या स्त्रोतांजवळ तयार होते. प्राचीन मातीचे साठे भूगर्भीय कालांतराने घट्ट होऊन शेल किंवा मडस्टोन-ल्युटाइट्स सारखे गाळाचे खडक तयार करतात. जेव्हा भूगर्भीय चिखलाचे साठे मुहानांमध्ये तयार होतात, तेव्हा परिणामी थरांना बे मड्स म्हणतात. मातीचा वापर बहुतेक घरांसाठी बांधकाम संसाधन म्हणून, जसे कवेलू, विटा, गारा आदी शतकानुशतके केला जातो आणि बाईंडर म्हणून देखील वापरला जातो. असा मानवी जीवनात चिखल खुपच महत्वाचा घटक आहे, हे विशेष! चला तर मग मस्तपैकी चिखल खेळुया...!!

!! जागतिक चिखल दिनानिमित्त सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

- संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.
पोटेगावरोड, गडचिरोली.
फक्त मधुभाष- ९६९९८३६७१७.

# श्री स्वामी समर्थ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अक्कलकोट येथे शिवराज्याभिषेक दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अक्कलकोट येथे आज शिवराज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला सर्वप्रथम सदर शिवराज्याभिषेक दिन ची सुरुवात राष्ट्रगीत गायनाने झाली त्यानंतर सर्व मान्यवरांचे स्वागत संस्थेचे शिल्प निदेशक श्री दिनेश मंठाळे सर यांच्याकडून करण्यात आले प्रस्तावनामध्ये दिनेश मंठाळे सर यांनी आजच्या शिवराज्याभिषेक दिनाचे महत्त्व उपस्थित सर्व प्रशिक्षणार्थ्यांना करून देण्यात आले त्यानंतर श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलनाने सदर शिवराज्याभिषेक दिनाचे उद्घाटन संस्थेचे आयएमसी चेअरमन श्री राजशेखर हिप्परगी साहेब प्रमुख वक्ते श्री प्रदीप आकुडे सर श्री कोटा सर संस्थेचे गटनिदेशक श्री काशीद सर यांच्या हस्ते करण्यात आले




सदर शिवराज्याभिषेक दिन कार्यक्रमास प्रमुख पाहुणे श्री राज शेखर हिप्परगी साहेब उपस्थित होते व प्रमुख वक्ते श्री प्रदीप आकुडे सर श्री कोटा सर उपस्थित होते संस्थेची प्रस्तावना संस्थे ची माहिती या संस्थेचे गटनिर्देशक तथा प्रभारी प्राचार्य श्री गणेश काशीद सर यांनी केली प्रमुख वक्ते मार्गदर्शन मध्ये श्री प्रदीप आकुडे सर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची शौर्यगाथा कथन केले उपस्थित प्रशिक्षणार्थ्यांना श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास स्मरण करून दिला श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्यकर्तृत्व चे लौकिक सर्व उपस्थित प्रशिक्षणार्थ्यांना समजावून सांगितले व त्याचे स्मरण सदैव आपण मनात ठेवून राहिले पाहिजे याची जाणीव करून दिली सदर शिवराज्याभिषेक दिनाचे महत्त्व स्मरण सतत आपल्या मनात राहील याचे बीज श्री प्रदीप आकुडे सर यांनी उपस्थित सर्व प्रशिक्षणार्थ्यांच्या मनात रुजवले सदर शिवराज्याभिषेक दिनाची सांगता राज्य गीताने करण्यात आली. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे जेष्ठ निदेशक श्री एम जी नदाफ सर सर श्री बगले सर श्री घोडके सर श्री बोंगाळे सर श्री बिराजदार सर श्री वाघमारे सर श्री लेंभे सर श्री सोनद सर श्री माडीकर श्रीमती चव्हाण उपस्थित होते शेवटी आलेल्या मान्यवरांचे आभार संस्थेचे जेष्ठ निदेशक श्री नदाफ सर यांनी केले.

# श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक माजी आमदार कर्मवीर स्वर्गीय आनंदरावजी (अण्णा) यांची २६ वी पुण्यतिथी उत्साहात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आज दिनांक २८/२०२० रोजी श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना कार्यस्थळे संस्थापक चेअरमन कर्मवीर स्वर्गीय (अण्णा) पाटील यांच्या सव्वीसव्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्याची पूजन करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.



यावेळी कारखान्याची व्हाईस चेअरमन सौप्रेमलता बब्रुवान रोंगे, संचालक सर्वश्री कालिदास साळुंखे, अशोक घाडगे महेश खटके, सचिन वाघाटी धनंजय काळे, सिद्धेश्वर बंडगर तसेच कारखान्याची कार्यकारी संचालक श्री एन डी आर गायकवाड, शेती अधिकारी सुरक्षा अधिकारी लीगल ऑफिसर व इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

उपस्थितीत मान्यवराची माजी आमदार कर्मवीर स्वर्गीय औदुंबर यांना पाटील यांची सहकार क्षेत्रातील कार्याच्या गौरवपूर्ण उल्लेख करून त्यांच्या विचारांचा आभार सांगण्याचा संकल्प व्यक्त केला व त्यांच्या दूरदृष्टीने श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना उभा राहिला असून शेतकरी कामगार व ग्रामीण भागाच्या विकास साठी त्यांनी दिलेले योगदान प्रेरणादायी असलेली यावेळी नमूद करण्यात आले.

कार्यक्रमाची सांगता उपस्थित आणि स्वर्गीय औदुंबर अण्णा पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून केली.

# सत्ताधारी भाजप व आर.एस.एस.चा हिंदुत्ववादी कुटील डाव ओळखा : ॲड. जयदेवराव गायकवाड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : विधानपरिषदेचे माजी आमदार ॲड. जयदेव गायकवाड यांनी उपवर्गीकरणाच्या निमित्ताने निर्माण झालेल्या मतभेदातून मातंग बौध्द जे एकमेकांवर जी अर्वाच्य भाषा वापरतात त्या बद्दल दुःख व्यक्त केले. व अवाहन केले की मातंग समाजाने गंभीरपणे विचार केला पाहिजे ते मागे का पडले ? आरक्षण तर सर्व ५९ जाती साठी होते मग मातंग समाजाने ते का संपादन केले नाही ?त्याचा त्यांनी शोध घेतला पाहिजे आणि क्षिक्षण ही काही वस्तु नाही की ती बंद गोदामात बंद करून ठेवता येते.ती बौध्दांनीच लुटून नेली हे म्हणणे चूकीचे आहे. डॉ. आंबेडकर या महामानवाने क्षिक्षण हे ज्ञान मिळविण्याचे साधन असून शिक्षण मिळाले तरच माणुस समृध्द होतो म्हणून शिका !,संघटित व्हा! आणि संघर्ष करा ! हा मंत्र सर्व समाजाला सांगितला होता. पूर्वाश्रमीचे महार तथा आजच्या बौध्दांनी शिक्षणाचा ध्यास घेऊन ते संपादन केले म्हणून त्यांनीच सर्व आरक्षण पळविले असे म्हणने अज्ञान पणाचे आहे.मातंगांनी डॉ. आंबेडकरांच्या पासून प्रेरणा घेतल्या असत्या तर ते ही पुढे



गेले असते.पण त्यांनी बाबासाहेबा कडून शिक्षणाच्या प्रेरणा घेतल्या नाहीत .आज ते हिंदुत्ववाद्यांच्या रणनितीला बळी पडतात .त्यानी हिंदुत्व वाद्यांचे डाव ओळखले पाहिजेत.ते आंबेडकरवाद्यावर करीत असलेले आरोप अज्ञानापोटी करीत आहेत म्हणून आंबेडकरवाद्यांनी त्यांना समजून सांगितले पाहिजे .व लढावू मातंगांनाही समतेच्या लढ्यात बरोबर घेतले पाहिजे असे अवाहन त्यांनी केले.

नवबौद्ध - मातंग समन्वयाच्या दिशेने.....

आज संपूर्ण महाराष्ट्रात अनुसूचित जाती अंतर्गत राखीव जागेच्या उप वर्गीकरणाचा प्रश्न चर्चिला जात असताना दोन्ही लढाऊ जातीच्या काही कर्मठ लोकांमुळे दोन जाती मधील तेढ निर्माण झाला आहे. समर्थन आणि विरोध ही आपआपल्या सोयीने भूमिका घेतली जाते तसेच भाजपा आर. एस. एस. यांच्या विखारी प्रचाराचे बळी ठरत आहेत, या पार्श्वभूमीवर दोन्ही लढाऊ व संघर्षशील जाती मधील समंजस लोकांनी समन्वयक भूमिका घेतली पाहिजे. या उद्देशाने पुण्यातील फुले शाहू आंबेडकर यांच्या क्रांतिकारक विचारांवर आधारित काम करणार्या कार्यकर्त्यांनी गुरुवार दिनांक २५ जून रोजी पुण्यातील बाळासाहेब ठाकरे कला दालन येथे नवबौद्ध व मातंग समाजातील लोकांची सलोखा परिषद आयोजित केली होती. यावेळी आपल्या भाषणात माजी आमदार व आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते जयदेवराव गायकवाड यांनी वरील विधान केले, ते पुढे म्हणाले की धर्मांध जातीवादी शक्तीचा अजेंडा असतो की समाजातील लढाऊ व संघर्षशील समूहाची भांडणे लावायची व त्यांचे ऐक्य होऊ द्यायचे नाही, आज आपण बघतो की भाजप व आर आर एस यांनी लावलेल्या भांडणात आपण एकमेकांच्या विरोधात शत्रू सारखे उभे आहोत, हे अत्यंत चुकीचे आहे.

या परिषदेला आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते वसंतराव साळवे, जेष्ठ नेते रोहिदास गायकवाड, आंबेडकरी अभ्यासक कार्यकर्ती धम्म संगिनी रमागोरख, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) नेते शैलेंद्र चव्हाण तसेच विचारवंत व कवी तसेच पूर्णवेळ कार्यकर्ते कॉ. महादेव खुडे, सुजित यादव, सुदीप गायकवाड तसेच मातंग समाजातील कार्यकर्ते अनिल हतागळे, यांनी मौलिक व महत्वाचे मार्गदर्शन केले, या परिषदेचे अध्यक्ष जेष्ठ नेते अंकल सोनवणे होते.या महत्वपूर्ण परिषदेत खालीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यात आले.

१) बदर समितीचा अहवाल प्रसिद्ध करण्यात यावा. २) उप वर्गीकरण समितीमधे सर्व अनुसूचित जातीच्या प्रतिनिधी, अभ्यासक, संशोधक, कार्यकर्ते यांचा समावेश करण्यात यावा. ३) सर्वप्रथम जातीय जनगणना करावी व त्यानंतर लोकसंख्येच्या प्रमाणात वर्गीकरण करावे. ४) कोणत्याही अनुसूचित जातीच्या व्यक्तीने बौद्ध धर्म स्विकारल्यास त्यांना नवबौद्ध गटात समाविष्ट करून घेण्याची मुभा असावी. ५)अश्या प्रकारच्या सलोखा परिषदा प्रत्येक शहरात घेण्यात याव्यात. ६) नवबौद्ध व मातंग या लढाऊ, संघर्षशील जातींच्या समन्वय मांडणाऱ्या भूमिकेसाठी महाराष्ट्रभर लॉन्ग मार्च काढण्यात यावे. ७)सलोखा परिषद ही फुले शाहू आंबेडकर व अण्णाभाऊ यांच्या क्रांतिकारक विचारावर आधारित असून कोणी व्यक्ती गट अथवा संघटना फुले शाहू आंबेडकर अण्णाभाऊ या महापुरुषां बद्दल बदनामी करत असेल व त्यातून समाजात द्वेषाचे वातावरण निर्माण करत असेल त्याचा आम्ही निषेध करतो.

ही परिषद समाजात ऐक्याची भूमिका घेऊन जाण्यासाठी अत्यंत महत्वाची भूमिका बजावणार आहे. ही परिषद सत्यशोधक बहुजन आघाडीचे अध्यक्ष सचिन बगाडे, वंचित बहुजन आघाडीचे नागेश भोसले, सुदर्शन चखाले, नागेश गायकवाड, ॲड. कपिल शिवशरण, राहुल सोनवणे, अरविंद पाटोळे, ॲड. आकाश साबळे या सर्वांनी मिळून घेऊन समाजात एकीचा संदेश दिला आहे.

# निफाड तालुका काँग्रेसच्या तालुकाध्यक्षपदी साहेबराव ढोमसे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



निफाड /प्रतिनिधी : गेल्या तीस वर्षांपासून काँग्रेस पक्षाबरोबर निष्ठेने कार्यरत असलेले निफाड तालुका काँग्रेस कमिटीचे विद्यमान कार्याध्यक्ष साहेबराव रंगनाथ पाटील ढोमसे यांची निफाड तालुका काँग्रेस कमिटीच्या तालुकाध्यक्षपदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली. सदर नियुक्तीचे पत्र मुंबई प्रदेश कार्यालयातून जाहीर करण्यात आले. मागील काळात काँग्रेसच्या तालुकाध्यक्ष पदाच्या दोन नियुक्त्या झाल्याने पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. पण त्यानंतर पक्ष संघटना अधिक सक्षम करण्यासाठी आणि कार्यकर्त्यांमध्ये एकोपा निर्माण करण्याच्या उद्देशाने प्रदेश काँग्रेस व नाशिक जिल्हा काँग्रेस कमिटीने विचार विनिमय करून पक्षासाठी सातत्याने काम करणारे उगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच तथा ज्येष्ठ कार्यकर्ते साहेबराव रंगनाथ पाटील ढोमसे यांच्यावर तालुकाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्याचा निर्णय घेतला. ढोमसे यांनी काँग्रेस पक्षाच्या विविध संघटनात्मक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतलेला असून ग्रामीण भागात त्यांच्या नियुक्तीमुळे पक्ष संघटना निश्चितच मजबूत होणार असल्याचे मानले जाते. सदर नियुक्ती बद्दल माजी मंत्री बाळासाहेब थोरात,महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, प्रदेश उपाध्यक्ष राजाराम पाटील पानगव्हाणे, शरदराव आहेर, भरत टाकेकर, रमेश कहांडोळ, दिगंबरराव गीते, मधुकरराव शेलार, प्रकाश अडसरे, निर्मलाताई खर्डे, शामराव शिंदे, सचिन होळकर, हेमंत जाधव, भास्करराव पानगव्हाणे, रोहिणी शेळके, सुहास सुरळीकर, अनवर शेख,मधुसूदन आव्हाड, बाळासाहेब सोमवंशी, भाऊसाहेब शिंदे, ज्ञानेश्वर चव्हाण, शकील शेख, रज्जाक शेख, दीपक बोरस्ते,गुणवंत होळकर,सुरेश कुमावत, सोमनाथ शिंदे, विश्वजीत आहेर, जावेद मणियार, भाऊसाहेब शिंदे आदींनी अभिनंदन केले आहे. नवीन जबाबदारी स्वीकारल्यानंतर ढोमसे यांनी पक्ष संघटना अधिक बळकट करून सर्व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन काम करणे. तसेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्षाला सक्षम करण्यासाठी प्रयत्नशील असणार असे सांगितले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# यावर्षीच्या आषाढी वारीत ही भाविकांना वेळेत दर्शन मिळण्यासाठी व्हीआयपी दर्शन बंद : पालकमंत्री जयकुमार गोरे

## सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांनी परस्परात समन्वय ठेवून मागील वर्षी प्रमाणे यावर्षीही उत्कृष्ट काम करावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आषाढी शुद्ध एकादशी सोहळ्यानिमित्त पंढरपूर येथे श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो वारकरी, भाविक येतात. त्यांना मागील वर्षी प्रमाणे यावर्षीच्या आषाढी वारीतही दर्शन कमी वेळेत व सुलभपणे व्हावे यासाठी १० जुलै २०२६ पासून व्हीआयपी दर्शन बंद तसेच मंदिर परिसरात नो वेहिकल झोन करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती राज्याचे ग्रामविकास व पंचायत राजमंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.

आषाढी वारी २०२६ अनुषंगाने पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली केबीपी कॉलेजच्या सभागृहात बैठक आयोजित करण्यात आले होती, त्या प्रसंगी ते मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, राष्ट्रीय महामार्ग चे प्रकल्प संचालक अभिजीत औटी, पोलिस उप विभागीय अधिकारी प्रशांत डगळे, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सह आयुक्त नगरपालिका आशिष लोकरे, अन्य धान्य पुरवठा अधिकारी ओंकार पडोळे, वीज वितरण चे अधीक्षक अभियंता सुनील माने, प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार, उप मुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत सूर्यकांत भुजबळ, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता श्याम कुंभार, पंढरपूर उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, मुख्याधिकारी महेश रोकडे, गटविकास अधिकारी अमोल जाधव यांच्या सह सर्व संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. गोरे पुढे म्हणाले की, मागील वर्षी व्हीआयपी दर्शन बंद केल्याने वारकरी भाविक यांचा श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनाचा वेळ किमान पाच ते सहा तास कमी झाला. तसेच मंदिर परिसरात नो व्हेकल झोन लागू केल्याने भाविकांना मंदिराला प्रदक्षिणा घालणं तसेच दर्शन घेऊन बाहेर पडणे सुलभ झाले होते. तसेच पोलिसांनाही गर्दीवर नियंत्रण ठेवणे शक्य झाले होते. त्यामुळे यावर्षीही १० जुलैपासून प्रशासनाने या दोन्ही बाबींची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

प्रशासनाने यावर्षीच्या वारीतही स्वच्छतेला सर्वोत्तम प्राधान्य द्यावे. नागरी भागात नगरपरिषद तर ग्रामीण भागात जिल्हा परिषदेने वारीच्या अगोदर आठ दिवसापासून स्वच्छता मोहीम सुरू ठेवावी. पंढरपूर शहर,



वाखरी पालखी तळ, ६५ एकर आणि वाळवंट या ठिकाणी कायम स्वरूपी शौचालये तसेच तात्पुरत्या शौचालयाची स्वच्छता व्यवस्थित करावी. महिला स्नानगृहे, हिरकणी कक्ष निर्माण करून त्यात आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध कराव्यात. तसेच पंढरपूर शहर तसेच उपरोक्त सर्व ठिकाणी कोठेही कचरा पडणार नाही यासाठी पुरेसे साफसफाईचे कर्मचारी नियुक्त करावेत. शौचालयाच्या ठिकाणी चिखल होणार नाही या दृष्टीने मुरमीकरण, काँक्रिटीकरण करून घ्यावे. पाणी, वीज पुरवठा सुरळीत ठेवावा, अशा सूचना पालकमंत्री श्री. गोरे यांनी दिल्या.

सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच नगरपरिषद पंढरपूर यांनी परस्परात योग्य समन्वय ठेवून शहरातील सर्व रस्त्यावरील खड्ड्यांचे दुरुस्ती करून घ्यावी तसेच नवीन मंजूर करण्यात आलेले रस्ते ही वेळेत पूर्ण करावेत. बांधकाम विभागाने शहरात आणखी रस्ते दुरुस्ती करण्यासाठी निधी आवश्यक असेल तर त्याबाबतची मागणी तात्काळ सादर करावी, पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात येईल. पालखीच्या दोन्हीही मार्गावर प्रत्येक मुक्कामे विसावा ठिकाणी शौचालय अगोदर दोन दिवस उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने सोलापूर जिल्हा परिषदेने सातारा व पुणे जिल्हा परिषदेची योग्य समन्वय ठेवावा यात कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी, असे निर्देशही पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

पालखी मार्गाच्या बाजूंना रस्त्याच्या कडेला विहिरी असतील तर संबंधित विभागांनी तात्काळ त्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात किमान सात ते आठ फूट उंचीचे मजबूत बॅरिकेटिंग करून घ्यावेत. चंद्रभागा नदीपात्रातील मोठे खड्डे जेसीबीच्या साह्याने तात्काळ भरून घ्यावेत. जलसंपदा विभागाने चंद्रभागा नदीत आषाढी एकादशीच्या अगोदर पाच सहा दिवस पाणी पोहोचेल या दृष्टीने धरणातून पाणी सोडण्याचे नियोजन करावे, यासाठी जिल्हाधिकारी यांनी स्वतंत्र बैठक घ्यावी. वारकरी, भाविकांसाठी पालखी मार्ग पंढरपूर शहर पालखी तळ या ठिकाणी दिशादर्शक चिन्ह मोठ्या अक्षरात व दिसेल अशा उंच ठिकाणी बसवावेत. आरोग्य विभागाने तिन्ही जिल्ह्यांना औषधांचा मुबलक पुरवठा करावा. पालख्या सोमवेत आरोग्य पथके ठेवावीत. वीज वितरण कंपनीने वारीसाठी पुरुष मनुष्यबळ उपलब्ध ठेवून ते २४ तास कर्तव्यावर राहतील असे नियोजन करावे, अशा सूचना पालकमंत्री श्री गोरे यांनी दिल्या.

मुख्यमंत्री आरोग्य रथ (मेडिकल ऑन व्हील) तसेच मुख्यमंत्री वारकरी सेवा सुविधा केंद्रात वारकरी भाविकांना सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांनी वाखरी ते केबीपी कॉलेज पर्यंत रस्त्याची कामे पूर्ण करावीत व स्वच्छता करून घ्यावी डिव्हायडरच्या मध्यभागी वृक्षारोपण करून घेणे लाइटिंग ची व्यवस्था करावी अशा सूचना श्री गोरे यांनी देऊन सर्व संबंधित विभागांनी मागील वर्षी प्रमाणे यावर्षीही परस्परात योग्य समन्वय ठेवून सर्वोत्तम काम करावे, असे आवाहन केले. तसेच मागील वर्षीच्या आषाढी वारीत केलेल्या कामाबद्दल सर्व विभागांचे त्यांनी अभिनंदनही केले.

बैठकीस आमदार समाधान आवताडे ऑनलाइनद्वारे उपस्थित होते यावेळी त्यांनी आषाढी यात्रा कालावधीत मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक एसटी बसद्वारे येतात. बसस्थानकाच्या ठिकाणची स्वच्छता राहण्यासाठी एसटी महामंडळाने ज्यादा स्वच्छता कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी. वारी कालावधीत पंढरपूर शहर व परिसरातील वेळोवेळी स्वच्छता होण्यासाठी ज्यादा स्वच्छता कर्मचारी नेमावेत. तसेच वारी कालावधीत मोबाईल नेटवर्कच्या समस्या उद्भवत असल्याने त्यावर आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात असे त्यांनी यावेळी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी मागील वर्षी प्रमाणे यावर्षीही वारीत परस्परात समन्वय ठेवून वारी यशस्वी करू असे सांगितले. तर पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी पोलीस विभागाच्या वतीने गर्दीवर नियंत्रण ठेवणे तसेच सुरक्षेसाठी उपाययोजना करणे याबाबत नियोजन केल्याचे सांगितले. तर मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी जिल्हा परिषदेच्या वतीने पालखी मार्गावर वारकऱ्यांना सुविधा उभारण्याचे काम सुरू असल्याचे सांगितले आहे.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी वारीसाठी केलेल्या कामाची माहिती दिली तर मुख्याधिकारी महेश रोकडे, गटविकास अधिकारी अमोल जाधव, जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर वर्षा डोईफोडे, पुरवठा विभाग, अन्न व औषध प्रशासन, वीज वितरण कंपनीचे अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग, जिल्हा पत्ती व्यवस्थापन अधिकारी यांनी त्यांनी केलेल्या नियोजनाची माहिती बैठकीत दिली.

### पालकमंत्री यांनी घेतले श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे मुखदर्शन

# पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केली श्री विठ्ठल- रुक्मिणी मंदीराची पाहणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधीः श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे जतन व संवर्धन करण्यासाठी मंदिर विकास आराखड्यातून पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली कामे सुरू असून, मंदिर विकास आराखड्यातून झालेल्या कामांची तसेच करण्यात येणाऱ्या कामांची पाहणी करून माहिती घेतली तसेच सद्यस्थितीत सुरू असलेली कामे आषाढी यात्रेपूर्वी पूर्ण करावीत जेणेकरून दर्शनासाठी येणाऱ्या वारकरी भाविकांना कोणताही त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

यावेळी जिल्हाधिकारी एस कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, आळंदी देवस्थानाचे विश्वस्त योगी निरंजननाथ, समितीचे सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, व्यवस्थापक प्रवीणकुमार घम उपस्थित होते. यावेळी कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी मंदिर जतन व संवर्धन आराखड्यातून सुरू असलेल्या कामांची माहिती दिली.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे मुखदर्शन घेतले तदनंतर मंदिर समितीच्या वतीने सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगावकर यांच्या हस्ते श्रींची मूर्ती व उपरणे देऊन सत्कार करण्यात आला.

# तुकोबारायांचे अभंग आता कन्नडमध्ये; भाषांच्या सीमापलीकडे संत विचारांचा सेतू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : संत साहित्य हे केवळ भक्तीचे नव्हे, तर समाजजागृती, समता आणि मानवतेचे जिवंत विद्यापीठ मानले जाते. मराठी संत परंपरेतील अजरामर ठेवा असलेल्या जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या अभंगांना आता कन्नड भाषेचा नवा स्वर लाभला आहे. ज्येष्ठ विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे लिखित 'संत तुकारामांचे अभंगशतक' या गाजलेल्या पुस्तकाचा शरणपरंपरेचे अभ्यासक, लेखक आणि अनुवादक शिवानंद गोगाव यांनी कन्नडमध्ये केलेला अनुवाद नुकताच प्रकाशित झाला.



कन्नड-मराठी सांस्कृतिक महामेळाव्याच्या निमित्ताने हुतात्मा स्मृती मंदिर येथे आयोजित दहाव्या महामेळाव्यात हा प्रकाशन सोहळा उत्साहात पार पडला. हम्पी विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. मल्लिका घंटी यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले.

यावेळी बोलताना डॉ. घंटी यांनी संत साहित्याच्या सांस्कृतिक भूमिकेवर भाष्य करताना सांगितले की, सोलापूर ही मराठी आणि कन्नड या भाषा-भगिनींच्या संस्कृतींचा संगम असलेली भूमी आहे. भाषांमधील वाढती दरी मिटवून सांस्कृतिक ऐक्य दृढ करण्याचे कार्य साहित्य करू शकते. तुकोबारायांच्या अभंगांचा हा कन्नड अनुवाद दोन संस्कृतींना जोडणारा जिवंत संवादसेतू ठरेल.

संत तुकारामांच्या अभंगांमधील अध्यात्म, सामाजिक प्रबोधन, समतेचा विचार आणि मानवी जीवनातील तत्त्वज्ञान आजही तेवढेच समकालीन मानले जाते. त्यामुळे अशा साहित्याचे विविध भाषांमध्ये होणारे अनुवाद हे केवळ भाषांतर नसून एका संस्कृतीचा दुसर्या संस्कृतीशी होणारा आत्मीय संवाद असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

सातारा येथील लोकायत प्रकाशनने हा ग्रंथ प्रकाशित केला असून प्रा. डॉ. धबाले यांची प्रस्तावना लाभली आहे. कार्यक्रमास किरीटेश्वर महास्वामी, चंद्रकांत बेल्लद यांच्यासह विविध राज्यांतून आलेले साहित्यप्रेमी आणि कन्नड भाषिक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**कन्नड वाचकांना पर्वणी**

तुकोबारायांच्या मूळ अभंगांचा भावार्थ, वैचारिक गाभा आणि त्यांच्या भूमिकेतील सहजता अबाधित ठेवण्याचा आपण प्रामाणिक प्रयत्न केल्याचे शिवानंद गोगाव यांनी सांगितले. डॉ. अ. हा. तात्यांनी निवडलेली ही शंभर अभंग आहेत. या कृतीमुळे कन्नड वाचकांना ही पर्वणी असून संत तुकारामांचे विचार अधिक जवळून अनुभवता येणार असल्याचा विश्वास गोगाव यांनी व्यक्त केला.

### डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर : भारतीय संविधान आणि सध्याची स्थिति यावर व्याख्यान

### अंजली धानोरकर मॅडम अप्पर जिल्हाधिकारी संभाजीनगर

# संविधानाला बळ देण्यासाठी आपण कार्य केले पाहिजे




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/पुणे : एस.के.गायकवाड : महात्मा फुले आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ पुरस्कार आणि विचार प्रसारक संस्था पुणे संस्थेच्या माध्यमातून माननीय अंजली धानोरकर जिल्हाधिकारी संभाजीनगर यांच्या व्याख्यानाने आयोजन केले होते त्यांच्या व्याख्यानाचा विषय डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर : भारतीय संविधान आणि सध्याची स्थिती.

जागरूक मतदार म्हणून वावरलेले पाहिजे नसेल तर वाईट लोकांमध्येच त्यांची गणना होईल या विषयावर बोलत असताना त्यावेळी त्यांनी संविधानाला बळ देण्यासाठी आपण कार्य केले पाहिजे असे प्रतिपादन माननीय अंजली धानोरकर मॅडम अप्पर जिल्हाधिकारी संभाजीनगर यांनी केले सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष माननीय एस एम डावरे हे होते.

त्यावेळी विचारपीठावर उपाध्यक्ष आयु चंद्रकांत काळे , उपाधाक्ष आयु तुकाराम डावरे, जनरल सेक्रेटरी आयु प्रा आर आर सोनकांबळे, आणि ग्रंथापुरस्कार प्रमुख आयु सवाखंडे आदी होते. प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष आयु एसएम डावरे यांनी केले पुढे धानोरकर मॅडमनी आपल्या भाषणात म्हणाले की लंडन येथील गोलमेज परिषदेत १९३१ साली अस्पृश्नाचे प्रतिनिधी म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर गेले होते त्यावेळी काँग्रेसने या परिषदेवर बहिष्कार टाकलेला होता. तेथे काय बोलायचे ह सर्व मुद्दे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना माहित होते तिथे केवळ बैठक किंवा चर्चा होणार नव्हती तर तेथे भारताचे भविष्य कसे असले पाहिजे भविष्यातला भारत येथे आकारास येण्याची शक्यता आहे म्हणून आपण तेथे गेले पाहिजे ह ज्यांना वाटत होते अनेक नेते तेथे गेले होते.

ब्रिटिशशी चर्चा करीत असताना एका सामान पातळीवर होत होती. बाकीचे नेते इमोशनल च्या आधारावर मुद्दे मांडत होते. मात्र बाबासाहेब एकमेव नेते होते ते वस्तुस्थिति च्या आधारावर तथ्यांच्या आधारावर मुद्दे मांडत होते.

भारतातील जाती व्यवस्था कशी आहे आणि या जातीव्यवस्थेचा परिणाम समाज कारणावर, अर्थव्यवस्थेवर कसा होत आहे आणी सामाजिक प्रतिष्ट्येवर कसा होत आहेत सविस्त्तर मुद्दे मांडत होते. आणी सगळे प्रॉब्लेम सांगत असताना इतकेच नाही देश विदेशातील उदाहरणं देऊन त्या देशांनी

समस्या वर उपाय कसे काढले आहेत आणी आपल्या देशांनी काय उपाय योजले पाहिजे ह सुद्धा ते सांगत होते थोडक्यात सांगत होते.इतर अनेक नेत्यांनी विचार मांडले पण त्या नेत्यामध्ये बाबासाहेब उठून दिसले असे आपल्या भाषणात म्हणाल्या.

ते केवळ एका समाजाचे नव्हते, तर तेथे भारताचे भविष्य कसे असणार आहे एका राष्ट्राचे नव्हते,भारताला तारणारे नव्हे तर जगाला तारणारे ग्लोबल लीडर होते. असे एकही क्षेत्र नाही की बाबासाहेबांचा परीसस्पर्श लाभलेला नाही. म्हणून आपणच पुढाकार घेतला पाहिजे की बाबासाहेब एका समाजासाठी नाहीत तर सर्व समाजासाठी काय काय केले आहेत ते . आपणच सांगितले पाहिजे. संविधान हे सर्वांसाठी मदत करणारे आहे असे आपल्या भाषणात सांगितले.

डॉ.बाबासाहेब लिहत असतानाचे एक पोस्टर आहे त्यावर लिहिले होते ख रा लशलरींश ुश रीश म्हणजे आपल्या प्रत्येकाचं अस्तित्व नगण्य आहे जर समाज नसेल तर? म्हणजे ख रा लशलरींश ुश रीश तुम्ही सगळे जण आहात म्हणून माझ्या अस्तित्वाला अर्थ आहे. बाबासाहेब होते म्हणून आपण

एक भारतीय नागरिक म्हणून एक स्वतंत्र पणाने स्वतंत्र अधिकाराने स्वतंत्र विचार करत जगू शकत आहोत असे विचार मान धानोरकर मॅडम यांनी मांडले. श्रोता गण मंत्रमुग्ध होऊन भाषण ऐकत होता.

डॉ बाबासाहेबांचे ऋण खऱ्या अर्थाने मान्य करावयाचे असतील आणि खऱ्या अर्थाने बाबासाहेबांनी आपल्यासाठी जे काही केलं त्याला थोडस पुरे पडायचे असेल तर आपण त्यांचे विचार बाकीच्या लोकांकडे पोहचविणे गरजेचे आहे असे विचार आपल्या अभ्यासपूर्ण भाषणामध्ये व्यक्त केले.

यावेळी सेवानिवृत्त सहाय्यक जिल्हाधिकारी सुनिता गायकवाड मॅडम यांचा सत्कार मान धानोरकर मॅडम आणि एस एम डावरे हस्ते करण्यात आला. सूत्र संचालन संस्थेचे जन. सेक्रेटरी आयु. प्रा आर आर सोनकांबळे यांनी केले, माननीय धानोरकर मॅडम व परिचय आयु. तुकाराम डावरे यांनी केले. यावेळी संस्थेचे माजी अध्यक्ष मान. ऍड एलटी सावंत साहेब,कोषध्यक्ष आयु महेंद्र शिंदे, सचिव अँड आयु होवोल प्रकाश,आयु. जी आर कांबळे, आयु. ननावरे आदी उपस्थित होते. आभार प्रदर्शन आयु अंकुश सवाखंडे यांनी केले राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# राज्यातील जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी यांनी एक कोटीचे विमा सुरक्षा कवच

## सोलापूर पॅटर्न राज्यात राबविणार : ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे; सुरक्षा कवच व केंद्र प्रमुख पदस्थापने बद्दल जिल्हा परिषदेचे कौतुक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर - सोलापूर जिल्हा परिषदेने दहा हजार पेक्षा अधिक अधिकारी व कर्मचारी यांना विमा सुरक्षा कवच प्रदान करून राज्यात विशेष उपक्रम राबविला आहे. राज्यातील ग्रामविकास विभाग अंतर्गत सर्व अधिकारी व कर्मचारी १ कोटी रूपये सॅलरी पॅकेज विमा सुरक्षा कवच प्रदान करणेत येणार असल्याची माहिती राज्याचे ग्राम विकास व पंचायराज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली. जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात आज केंद्र प्रमुख पदी निवड झालेल्या केंद्रप्रमुख पदस्थापनेचे आदेशाचे वितरण व जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचारी सॅलरी सुरक्षा कवच करार व जिल्हा परिषद पदाधिकारी यांना नवीन वाहनाचे चावी प्रदान आज ग्राम विकास मंत्री व पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे हस्ते करणेत आला. या प्रसंगी आमदार देवेंद्र कोठे,जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दिपक वैद्य हे होते. या सभेस उपाध्यक्ष इंद्रजित पवार, शिक्षण व आरोग्य समितीचे सभापती चेतनसिंह केदार, समाज कल्याण सभापती संस्कृती सातपुते, कृषी व संवर्धन समितीचे सभापती रामप्पा चिवडशेट्टी, महिला बाल कल्याण समितीचे सभापती अमृता वाघे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप, उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मीनाक्षी वाकडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ, जिल्हा आरोग्य अधिकारी सतीश कोपुरवाड, कार्यकारी अभियंता प्रसाद काटकर , कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे,स्टेट बँक ऑफ इंडियाचे विभागीय व्यवस्थापक आनंदकुमार




काटकर, मुख्य व्यवस्थापक अनिकेत शिवडेकर, ट्रेझरी शाखेचे व्यवस्थापक अतुल मगदुम, अतिरिक्त मुख्य लेखा वित्त अधिकारी शशीकिरण उबाळे , लेखाधिकारी मिरगळे प्रमुख उपस्थित होते.

प्रारंभी जिल्हा परिषदेचे प्रागंणात जिल्हा परिषद अध्यक्ष जयकुमार गोरे व उपाध्यक्ष इंद्रजित पवार व समितीचे सभापती व पंचायत समितीचे सभापती यांना नवीन वाहनाचे चावी प्रदान पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे हस्ते करणेत आला.

जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात अधिकारी व कर्मचारी सॅलरी पॅकेज विमा सुरक्षा कवच करार व केंद्र प्रमुख पदस्थापना आदेशाचे वितरण कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. प्रारंभी प्रास्तविक मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे व शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी प्रास्तविक केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव यांनी केले. मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे यांनी १० हजार पेक्षा अधिक अधिकारी व कर्मचारी यांना या विमा सुरक्षा कवचाचा लाभ होणार आहे. सोलापूर जिल्हा परिषद राज्यात पहिली जिल्हा परिषद असून हा करार होत असल्याचे सांगितले. १ कोटी रूपये विमा कवच व इतर लाभ मिळणार असल्याचे सांगितले.

**जिल्हा परिषद अधिकारी कर्मचारी यांनी १ कोटींचे विमा कवच – ना. जयकुमार गोरे**

सोलापूर जिल्हा परिषदेने सर्वसामान्यांना सेवा देत असताना अधिकारी व कर्मचारी यांना सुरक्षा कवच देऊन राज्यात आदर्श निर्माण केला आहे. सिईओ कुशल जैन व मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे यांचे अभिनंदन केले. हा उपक्रम राज्यातील जिल्हा परिषद अंतर्गत काम करणारे कर्मचारी यांचे साठी राबविणेत येणार आहे. अपघातात अपंगत्व आल्यास अंपगत्वाच्या टक्केवारीनुसार जास्तीत जास्त ८० लक्ष रूपये, अपत्यांचे विवाह साठी आर्थिक मदत, एका अपत्याचे उच्च शिक्षणासाठी १० लक्ष मदत असे विविध सुरक्षा कवच देणारा हा नाविण्यपुरिण उपक्रम राज्यात राबविणार असल्याचे ग्रामविकास मंत्री गोरे यांनी सांगितले.

राज्यात केंद्र प्रमुख यांचे जागा भरा म्हणून आज मला चार निवेदने प्राप्त झाली. परंतू ही प्रक्रिया सोलापूर जिल्हा परिषदेने करून पदस्थापना आदेश वितरीत केले बद्दल शिक्षण सभापती चेतनसिंह केदार व सिईओ कुशल जैन व प्रशासन व शिक्षण विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन केले. चारचाकी वाहनांचा उपयोग जनतेच्या सेवा अधिक सुलभ होणे साठी करावा. सोलापूर सारख्या ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या जिल्ह्याचे अध्यक्षपद मिळालेले दिपक वैद्य यांचे देखील अभिनंदन करून सर्व पदाधिकारी यांनी विकासास गती देणेचे आवाहन केले.

---

# सलगर येथे आजपासून जय हनुमान कारुणी यात्रा महोत्सवास प्रारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट /प्रतिनिधी : तालुक्यातील सलगर येथे सालाबादाप्रमाणे यंदाच्या वर्षीही श्री जय हनुमान कारुणी यात्रा-महोत्सव निमित्त विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

यानिमित्त सोमवार ( दि. २९ ) व्हन्नुगी, पहाटे जय हनुमान मुर्तीस महारुद्राभिषेक, सकाळी कळसारोहण, दुपारी पालखी उत्सव, नंदीध्वज, कुंभ, मिणीदोरसहीत पालखी व रथोत्सव कार्यक्रम सायं.७ वाजेपर्यंत भव्य मिरवणूक परम पूज्य श्री. मी. नि. प्र. अभिनव शिवबसव महास्वामीजी श्री शिव बसवेश्वर विरक्त मठ (कारुणी) सलगर यांच्या आगमनानंतर यांच्या दिव्य सानिध्यात शोभेचे दारुकाम व रथोत्सव कार्यक्रम संपन्न होईल व रात्रौ १० वाजता

श्री जय हनुमान पारिजात भजना मंडळ व श्री महादेव भजना मंडळ,सलगर यांचा भजन कार्यक्रम होणार आहे. मंगळवार ( दि.३० ) कारुणी यात्रा महोत्सव पहाटे ३ ते सकाळी ७ पर्यंत दंडवत व सकाळी ७ ते दुपारी १२ पर्यंत बैलांचे मिरवणूक, मंदिर परिसरात दुपारी १२ ते सायंकाळी ६ :०० पर्यंत कारुणी बैल गाड्यांचे पळविण्याचा भव्य कार्यक्रम होणार आहे. मंगळवार दि. ३० जून २०२६ रात्री १०:०० वाजता जय हनुमान नवतरुण नाट्यसंघ सलगर कन्नड कौटुंबिक नाटक मग होदरु मांगल्य भेटू अर्थात हेतवळ हालू विषवाईतू बुधवार ( दि. १ ) रोजी दिवसभर कलगीतुराई गाणे हाडकी, डप्पीन



पदा भजन मंडळ सौ. भाग्यश्री कंबारहाळ, - जमखंडी श्री. मौलासाहेब मकानदार मशीबनाळ यांचे सुंदर भजन कार्यक्रम गुरुवार दि.०२ जुलै २०२६ रात्री १०:०० वा. जय हनुमान नवतरुण नाट्यसंघ सलगर कन्नड कौटुंबिक नाटक मग होदरु मांगल्य भेटू अर्थात हेतवळ हालू विषवाईतू परगावहून आलेल्या भक्तगणांना पिण्याच्या पाण्याची व महाप्रसादची सोय केलेली आहे. तरी सर्व सदभक्तांनी यात्रेत सहभागी होण्याचे आवाहन श्री जय हनुमान कारुणी यात्रा पंचकमिटी केले आहे.

---

# टाकळीवाडीत पल्स पोलिओ मोहिमेला उस्फूर्त प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी प्रतिनिधी : टाकळीवाडी : राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेला टाकळीवाडी येथे नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. गावातील अंगणवाडी केंद्रांवर सकाळपासूनच पालकांनी आपल्या पाच वर्षांखालील बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजण्यासाठी गर्दी केली.

आरोग्य विभाग, आशा सेविका, अंगणवाडी सेविका तसेच ग्रामपंचायत यांच्या संयुक्त प्रयत्नातून ही मोहीम यशस्वीपणे राबविण्यात आली.




आरोग्य कर्मचाऱ्यांनी घरभेटी देऊन तसेच जनजागृती करून प्रत्येक बालकापर्यंत लस पोहोचविण्याचा प्रयत्न केला.

प्रत्येक बालकाला पोलिओचे दोन थेंब हा संदेश प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचल्याने पालकांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदविला.

गावातील सर्व पात्र बालकांचे लसीकरण पूर्ण करण्यासाठी आरोग्य विभागाने विशेष प्रयत्न केले असून मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने समाधान व्यक्त करण्यात आले.

---

# अकोले पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांची दैनिक समर्थ गांवकरी कार्यालयास सदिच्छा भेट!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अकोले/प्रतिनिधी:

अकोले पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांनी दैनिक समर्थ गांवकरी तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी पत्रकार व पोलीस यांच्यात सामाजिक प्रश्न, कायदा व सुव्यवस्था तसेच जनसहभाग या विषयांवर सकारात्मक चर्चा झाली.




यावेळी बोलताना पोलीस निरीक्षक संदीप कोळी म्हणाले की, सांगली जिल्ह्यातील तासगाव हे माजी गृहमंत्री स्वर्गीय आर. आर. पाटील यांचे गाव असून, पोलीस दलात काम करताना त्यांनी जनतेचे प्रश्न नेहमीच केंद्रस्थानी ठेवले. त्याच विचारांचा वारसा पुढे नेत सदरक्षणाय खलनिग्रहणाय या पोलीस दलाच्या ब्रीदवाक्यानुसार पोलीस हा जनतेचा विश्वासू दूत आहे. नागरिकांनी पोलिसांना सहकार्य केल्यास अकोले तालुक्यात शांतता, सुव्यवस्थित वाहतूक आणि वाद-विवादांचे प्रभावी निवारण करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध राहील, असे त्यांनी सांगितले.

या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांचा खोबऱ्याचा हार, डायरी व पेन देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अकोले तालुका सचिव हरिभाऊ फापाळे तसेच पोलीस कॉन्स्टेबल सुहास गोरे उपस्थित होते. यावेळी सुहास गोरे यांचाही शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

या सदिच्छा भेटीमुळे पोलीस प्रशासन आणि पत्रकारिता यांच्यातील समन्वय अधिक दृढ होऊन समाजहिताच्या कार्याला बळ मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

---

# विद्यापीठामध्ये राजर्षी शाहू महाराज यांची जयंती उत्साहात साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे /प्रतिनिधी : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये राजर्षी शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आली. विद्यापीठातील राजर्षी शाहू महाराज यांच्या पुतळ्याजवळ सदर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. (डॉ.) सुरेश गोसावी आणि प्र-कुलगुरू प्रा. (डॉ.) पराग काळकर यांच्या हस्ते शाहू महाराज यांच्या तैलचित्रास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमास अधिष्ठाता प्रा. (डॉ.) प्रभाकर देसाई, प्रा. (डॉ.) धनंजय मंडलिक, प्रा. (डॉ.) सदानंद बनसोडे, प्रा (डॉ) रावसाहेब लटपटे, शिक्षणशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.(डॉ) विलास आढाव, तसेच विद्यापीठ विभागातील विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# एड्स नियंत्रण कर्मचारी संघटनेचे वतीने आमदार गोकुळ गीते यांचा सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग अंतर्गत महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण कर्मचारी संघटनेचे वतीने आमदार गोकुळ गीते यांचा सत्कार नुकतेच स्थानिक स्वराज्य संस्था नाशिक येथून नवनिर्वाचित आमदार गोकुळ बबनराव गीते यांचा महाराष्ट्र राज्यातील उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भातील पदाधिकारी, अध्यक्ष, उपाध्यक्ष, खजिनदार व सचिव सदस्य यांच्यामार्फत सत्कार करण्यात आला.

सबंध एड्स नियंत्रण कर्मचारी यांचा संघर्षशील प्रवासाच्या अनुषंगाने शिवसेना पक्षाचे आमदार गोकुळ यांच्या नेतृत्वावर आणि लोकाभिमुख कार्यशैलीवर जनतेने दाखवलेला विश्वास त्यांचा असलेला सातत्यपूर्ण जनसंपर्क प्रामाणिक कार्य आणि सामाजिक बांधिलकी जपत लोकहिताचे निर्णय घेणारे आ गिते यांनी उपस्थित राहुन राज्य एड्स नियंत्रण कर्मचारी संघटनेचे कार्याचे कौतुक केले व पुढे कोणतेही काम असेल तर ते मी करेल शब्द दिला. निवेदनाच्या माध्यमातून सबंध कर्मचारी पदाधिकारी यांनी आपल्या समस्या मांडल्या... आमदार गोकुळ भाऊ गीते यांनी आभार व्यक्त केलै.

---

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेतील सेवानिवृत्त शिक्षकांच्या सत्कार समारंभात गौरव उद्‌गार

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे प्रतिपादन

# शिक्षण सेवेतून निवृत्ती ही शिक्षकांच्या जीवनातील नवीन पर्वाची सुरुवात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/अक्कलकोट :

शिक्षकांची शिक्षण क्षेत्रातून निवृत्ती ही त्यांच्या जीवनातील नवीन पर्वाचा प्रारंभ असतो. त्यांचे ज्ञान, अनुभव आणि विद्यार्थ्यांवरील प्रेम कधीही निवृत्त होत नाही. म्हणून शिक्षकांनी सेवानिवृत्ती नंतर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याची भूमिका घेतली पाहिजे, समाजाला आपल्या अनुभवाचा लाभ देऊन सन्मान मिळवला पाहिजे असे प्रतिपादन आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेतील सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक विद्यालय अक्कलकोट व अनंत चैतन्य विद्यालय हन्नूर येथील



पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात सेवानिवृत्त मुख्याध्यापक व शिक्षकांचा सत्कार करताना आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी व मान्यवर

मुख्याध्यापक अशोक साखरे, सरदार मतेखाने पर्यवेक्षक सुरेश रूगे, श्रीमती श्रीदेवी मायनाळे, सेवक विश्वनाथ सैदे यांच्या सेवानिवृत्ती निमित्त सत्कार समारंभ पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलामध्ये आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, उपाध्यक्ष भीमराव साठे,माजी मुख्याध्यापक सिद्धेश्वर कल्याणशेट्टी, संचालिका तथा जि प सदस्या शांभवी कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, जूनियर विभाग प्रमुख पूनम कोकळगी, सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, किणी प्रशालेचे माजी मुख्याध्यापक अशोक रामशेट्टी उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, शिक्षकांच्या निःस्वार्थ सेवेमुळे संस्थेची शैक्षणिक प्रगती होते. संस्थेच्या वाटचालीत सुरुवातीला आलेल्या शिक्षकांचा मोलाचा वाटा असतो. त्यांनी आपल्या कर्तव्यनिष्ठेने आणि समर्पणाने घालून दिलेला आदर्श पुढील पिढीतील शिक्षकांसाठी प्रेरणादायी असते, म्हणून सेवानिवृत्त शिक्षकांनी नवीन पर्वाची सुरुवात करत असताना समाजाचे व विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक झाले पाहिजे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी केले, सूत्रसंचलन कल्पना स्वामी यांनी केले तर आभार मनीषा दूधभाते यांनी मानले. या कार्यक्रमास हन्नूर प्रशालेचे मुख्याध्यापक ज्ञानदेव शिंदे, माजी मुख्याध्यापक विलास बिराजदार, गुरूनाथ गवंडी, पर्यवेक्षक सिद्रामप्पा पाटील, भैय्या मुल्ला उपस्थित होते.

### स्पर्धा परीक्षेसाठी मोफत मार्गदर्शन करावे

**सेवानिवृत्तीनंतर शिक्षक हा शिक्षण क्षेत्राशी जोडलेला असतो, म्हणून सेवानिवृत्त शिक्षकांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी मोफत मार्गदर्शन केले पाहिजे. वाचन संस्कृती, सामाजिक उपक्रम, व्याख्याने व शैक्षणिक कार्यक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला पाहिजे असे प्रतिपादन शांभवी कल्याणशेट्टी यांनी केले.**